**आजचे पंचांग**

रविवार, दि. १७ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, प्रतिपदा रात्री ९-४१ पर्यंत नंतर द्वितीया तिथी, दिवस नक्षत्र- कृत्तिका दुपारी २-३२ पर्यंत नंतर रोहिणी, चंद्र रास - वृषभ, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## आता गोकुळचीही दरवाढ

**पुणे**: कोल्हापुरातील दुग्ध व्यवसायातील अग्रगण्य संस्था असलेल्या गोकुळ दूध संघाने सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसेल असा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वाढणारा खर्च आणि इतर तांत्रिक कारणांमुळे गोकुळने आपल्या दूध विक्री दरात वाढ करण्याची घोषणा केली आहे. गोकुळ दूध संघाने गाईच्या दूध विक्री दरामध्ये प्रतिलिटर दोन रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 रविवार, दि. १७ मे, २०२६ वर्ष - १ अंक - २३१ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### वाहन दरीत कोसळून दोन पर्यटकांचा मृत्यू

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यात शनिवारी वाहन रस्त्यावरून घसरून खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात दोन पर्यटकांचा मृत्यू झाला आणि स्थानिक चालकासह तीन जण जखमी झाले. दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील पहलगाम-अरु मार्गावर गुजरातमधील पर्यटकांना घेऊन जाणाऱ्या टॅक्सीला अपघात झाला. या अपघातात एका महिलेसह दोन पर्यटकांचा मृत्यू झाला, तर चालकासह तीन जण जखमी झाले.

### संजीव अरोरा यांच्या ईडी कोठडीत वाढ

**गुरुग्राम :** पंजाबचे मंत्री संजीव अरोरा यांच्या १०० कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीच्या कोठडीत वाढ करण्यात आली आहे. सात दिवसांची कोठडी संपल्यानंतर अरोरा यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) गुरुग्राम न्यायालयात हजर केले. बोगस कंपन्यांमार्फत निधी मिळवणे, बेनामी मालमत्ता खरेदी करणे आणि या प्रकरणाशी संबंधित अनेक व्यक्तींची चौकशी करणे आवश्यक आहे, असे सांगत एजन्सीने त्याला आणखी पाच दिवसांची कोठडी मागितली आहे.

### महिलांची सुरक्षा आणि शिक्षण महत्त्वाचे

**नवी दिल्ली :** महिलांची सुरक्षा आणि शिक्षण हा सरकारसाठी सर्वात मोठा चिंतेचा विषय आहे, असे प्रतिपादन दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी केले आहे. आमदार अनिल शर्मा यांनी आयोजित केलेल्या आर के पुरम भागात सायकल वितरण कार्यक्रमात गुप्ता उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान इयत्ता दहावी आणि बारावी उत्तीर्ण झालेल्या मुलींना ५०० सायकलींचे वाटप करण्यात आले.

### सीबीएसईचा निर्णय; दोन भारतीय भाषा शिकणे बंधनकारक

# नववी-दहावीसाठी तीन भाषा अनिवार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने शैक्षणिक वर्ष दोन हजार सव्वीस-सत्तावीसपासून इयत्ता नववी आणि दहावीच्या भाषा धोरणात महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. पंधरा मे दोन हजार सव्वीस रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, ही सुधारित रचना राष्ट्रीय शिक्षण धोरण दोन हजार वीस आणि शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा दोन हजार तेवीस यांच्या धर्तीवर तयार करण्यात आली आहे.

नव्या धोरणानुसार, १ जुलै पासून इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषांचा अभ्यास अनिवार्य राहणार आहे. या तीन भाषांना आर-एक, आर-दोन आणि आर-तीन असे स्वरूप देण्यात आले असून त्यापैकी किमान दोन भाषा मूळ भारतीय भाषा असणे आवश्यक आहे, असे सीबीएसईने स्पष्ट केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता नववी आणि दहावीच्या एनसीईआरटी अभ्यासक्रमाचा आढावा घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे बोर्डाने म्हटले आहे. सध्याचे शैक्षणिक वर्ष एप्रिल २०२६ पासून सुरू झाले असले, तरी या बदलाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. सुधारित भाषा धोरणानुसार, विद्यार्थ्यांना परदेशी भाषा निवडायची असल्यास इतर दोन निवडलेल्या भाषा मूळ भारतीय असणे आवश्यक राहील. याशिवाय परदेशी भाषा चौथी अतिरिक्त भाषा म्हणूनही शिकता येणार आहे. सीबीएसईने सर्व संलग्न शाळांना भाषा शिक्षणाशी संबंधित अद्ययावत अभ्यासक्रम, उद्दिष्टे, क्षमता आणि शिकण्याच्या निष्पत्तींचा अभ्यास करण्याचे निर्देश दिले आहेत.

परिपत्रकात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणादरम्यान भाषा क्षमतांमध्ये मोठ्या प्रमाणात समानता असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वाचन आकलन, मौखिक संवाद, व्याकरण आणि लेखन कौशल्य यांसारख्या घटकांमध्ये सुमारे पंच्याहत्तर ते ऐंशी टक्के समानता असल्याचे बोर्डाने स्पष्ट केले आहे. आर-तीनसाठी स्वतंत्र पाठ्यपुस्तके उपलब्ध होईपर्यंत इयत्ता नववीचे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष दोन हजार सव्वीस-सत्तावीसमध्ये निवडलेल्या भाषेचे इयत्ता सहावीचे आर-तीन पाठ्यपुस्तक वापरतील. शाळांना या पाठ्यपुस्तकांसोबत स्थानिक किंवा राज्य पातळीवरील साहित्य, कविता, लघुकथा आणि कादंबऱ्यांचा समावेश करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पूरक साहित्याची निवड आणि त्याच्या अध्यापन पद्धतीबाबत सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे पंधरा जून दोन हजार सव्वीसपर्यंत जारी केली जाणार आहेत. या संक्रमण काळात काही शाळांना मूळ भारतीय भाषांसाठी पात्र शिक्षक मिळवण्यात अडचणी येऊ शकतात, हे सीबीएसईने मान्य केले आहे. यासाठी शाळांना लवचिक पर्याय वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. सहोदय क्लस्टर्सच्या माध्यमातून शाळांमध्ये संसाधनांची देवाणघेवाण, हायब्रीड अध्यापन पद्धती, सेवानिवृत्त भाषा शिक्षकांची मदत आणि योग्य पात्रता असलेल्या पदव्युत्तर उमेदवारांची नियुक्ती अशा उपायांचा समावेश करण्यात आला आहे.

# देशभरातील मेडिकल दुकाने २० मे रोजी बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : ई-फार्मसी आणि ऑनलाइन औषध विक्रीच्या निषेधार्थ ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्सने २० मे रोजी देशव्यापी बंद पुकारला आहे. देशभरातील मेडिकल दुकाने आणि औषध वितरक बंद ठेवण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.

ऑनलाइन औषध विक्रीवरील अपुरे नियमन, प्रिस्क्रिप्शन तपासणीतील त्रुटी आणि ई-फार्मसी कंपन्यांच्या कार्यपद्धतीविरोधात हा एकदिवसीय बंद पुकारण्यात आला आहे. देशभरातील सुमारे १२.४० लाख केमिस्ट दुकाने आणि औषध वितरक या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेकडून देण्यात आली आहे. महाराष्ट्रासह गुजरात, दिल्ली, उत्तर प्रदेश, आसाम, गोवा आणि नागालँडमध्ये या बंदचा मोठा परिणाम जाणवण्याची शक्यता आहे. मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या शहरांमध्ये अनेक मेडिकल स्टोअर्स बंद राहू शकतात.

केमिस्ट संघटनांच्या म्हणण्यानुसार, ई-फार्मसी प्लॅटफॉर्मवर प्रिस्क्रिप्शनची योग्य तपासणी केली जात नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने बनावट प्रिस्क्रिप्शन तयार करून अँटिबायोटिक्स, ऑपिऑइड्स, व्यसनाधीन करणारी औषधे आणि काही बंदी असलेली औषधे विकली जात असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात सवलती देऊन ग्राहकांना आकर्षित केले जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे. काही प्रकरणांमध्ये मुदत संपण्याच्या जवळ आलेली औषधे विकली जात असल्याचा आरोपही संघटनांनी केला आहे.

# अजित पवारांना सर्वाधिक त्रास रोहित यांनीच दिला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत शंका उपस्थित करत शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांना राष्ट्रवादी काँग्रेसने पत्रकार परिषद घेऊन उत्तर दिले आहे.

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश आदिक आणि प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषद घेत रोहित पवारांचे आरोप फेटाळले. प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्याबाबत सुरू असलेल्या चर्चा निराधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अविनाश आदिक यांनी स्पष्ट केले की, प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रीय कार्यकारिणीत राष्ट्रीय कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत, तर सुनील तटकरे हे प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. "रोहित पवार स्वतःचे राजकारण चालवण्यासाठी वारंवार अजित पवार आणि आमच्या पक्षाबद्दल बोलत असतात. अजित पवारांना सर्वाधिक मानसिक त्रास कोणी दिला असेल, तर तो रोहित पवारांनीच दिला," असा गंभीर आरोप राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी केला.

उमेश पाटील म्हणाले की, रोहित पवार यांनी अजित पवारांचे नाव वापरणे थांबवावे. शरद पवार गटातील आमदार आणि खासदार आमच्या संपर्कात आहेत. आम्ही हालचाल केली, तर तुमचा पक्ष राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

### महिलांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारचा कठोर पवित्रा

# पॉश कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : नाशिकमधील एका नामांकित कंपनीत उघडकीस आलेल्या कथित 'कॉर्पोरेट जिहाद' प्रकरणानंतर राज्य सरकारने कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेबाबत कठोर भूमिका घेतली आहे. राज्यातील शासकीय, निमशासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी महिला व बाल विकास विभागाने 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियम, २०१३' अर्थात पॉश कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात विभागाकडून परिपत्रक जारी करण्यात आले असून कंपन्या आणि आस्थापनांची तपासणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. नाशिकमधील घटनेच्या पार्श्वभूमीवर अंतर्गत सुरक्षा यंत्रणा नसलेल्या कंपन्यांवर कारवाई करण्याचा इशारा सरकारने दिला आहे. नव्या आदेशानुसार, राज्यातील ज्या आस्थापनांमध्ये दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्या सर्व ठिकाणी अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक राहणार आहे. ही समिती केवळ औपचारिक न राहता प्रभावीपणे काम करावी, यासाठी तिच्या रचनेबाबतही स्पष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या समितीत किमान पन्नास टक्के महिला सदस्य असणे आवश्यक आहे. तसेच समितीच्या अध्यक्षपदी वरिष्ठ महिला कर्मचारी असणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय बाह्य स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधीचा समावेश करणेही अनिवार्य राहणार आहे.

पीडित महिलांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा कारवाईत टाळाटाळ करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. अशा कंपन्यांचे परवाने रद्द करण्याची तयारीही सरकारने दर्शवली आहे. महिलांना तक्रार नोंदवण्यासाठी ई-मेल, लेखी अर्ज तसेच केंद्र सरकारच्या 'शी-बॉक्स' पोर्टलसारखी विविध माध्यमे उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तक्रार प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत कायदेशीर प्रक्रिया सुरू करणे संबंधित आस्थापनांसाठी बंधनकारक असेल. चौकशीदरम्यान तक्रारदार महिलेची गोपनीयता राखणे, तिच्यावर मानसिक ताण येऊ नये याची काळजी घेणे, तसेच आवश्यकतेनुसार सुटी किंवा विभाग बदल यांसारखा अंतरिम दिलासा देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. महिलांच्या सुरक्षेबाबत कोणतीही हलगर्जी सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या निर्णयातून राज्य सरकारने दिला आहे. राज्यातील सर्व कंपन्या आणि आस्थापनांनी पॉश कायद्याचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन महिला व बाल विकास विभागाने केले आहे.

### तिसऱ्या अपत्यासाठी ३०, तर चौथ्यासाठी ४० हजार रुपये

# लोकसंख्यावाढीला आंध्र प्रदेशाचे प्रोत्साहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अमरावती** : राज्यातील घटत्या लोकसंख्येचा आलेख उंचावण्यासाठी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी मोठी घोषणा केली आहे. राज्यातील कुटुंबांना तिसऱ्या अपत्याच्या जन्मावर ३० हजार रुपये, तर चौथ्या अपत्याच्या जन्मावर ४० हजार रुपयांचे आर्थिक प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

शनिवारी श्रीकाकुलम जिल्ह्यातील नरसन्नापेटा येथे झालेल्या जाहीर सभेत नायडू बोलत होते. स्वर्णांध्र-स्वच्छांध्र स्वच्छता मोहिमेदरम्यान त्यांनी ही घोषणा केली. "मी एक नवीन निर्णय घेतला आहे. तिसऱ्या अपत्याच्या जन्मानंतर लगेचच ३० हजार रुपये आणि चौथ्या अपत्यासाठी ४० हजार रुपये देण्यात येतील," असे नायडू यांनी सांगितले. सरकारने हा निर्णय घेतला असून पुढील एका महिन्यात याचे सविस्तर तपशील जाहीर केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील जन्मदर वाढवण्यासाठी समाजाने एकत्र येऊन काम करण्याची वेळ आली आहे, असे नायडू म्हणाले.

एकेकाळी लोकसंख्या नियंत्रणाच्या उपायांचे समर्थन करणारे नायडू आता बदललेल्या भूमिकेत दिसत आहेत. यापूर्वी त्यांनी दुसऱ्या अपत्याच्या जन्मासाठी २५ हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याचा प्रस्ताव मांडला होता. ५ मार्च रोजी विधानसभेत बोलताना राज्य सरकार दुसऱ्या अपत्यासाठी २५ हजार रुपयांचा भत्ता देण्याचा विचार करत असल्याचे त्यांनी सांगितले होते.

नायडू यांच्या मते, बदलत्या सामाजिक आणि आर्थिक प्रवाहांमुळे कुटुंबाचा आकार लहान होत चालला आहे. उत्पन्न वाढल्यामुळे काही जोडपी एकाच मुलाला प्राधान्य देत आहेत. तर काही जोडपी पहिले अपत्य मुलगा नसेल तरच दुसऱ्या अपत्याचा विचार करतात. लोकसंख्या वाढीचा वेग मंदावत असल्याचे सांगत नायडू यांनी सरासरी प्रजनन दर प्रति महिला २.१ मुले असल्यास लोकसंख्या स्थिर राहते, असे त्यांनी स्पष्ट केले.

अनेक देशांमध्ये घटती लोकसंख्या आणि वयोवृद्ध होत चाललेला समाज यामुळे आर्थिक विकासावर परिणाम होत असल्याचा इशाराही नायडू यांनी दिला. त्यामुळे आंध्र प्रदेशमध्ये जन्मदर वाढवण्यासाठी सरकारकडून प्रोत्साहनपर उपाययोजना राबवल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### पाणी करारावर संबंध अवलंबून

**ढाका :** बांगलादेशच्या सत्ताधारी बीएनपीने शनिवारी सांगितले की, भारतासोबतचे संबंध नवीन गंगा पाणी वाटप करारावर अवलंबून असतील. १९९६ मध्ये स्वाक्षरी केलेला भारत-बांगलादेश गंगा जल वाटप करार डिसेंबरमध्ये संपणार आहे. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे (बीएनपी) सरचिटणीस मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर यांनी येथे एका कार्यक्रमात सांगितले की, "आम्ही भारत सरकारला स्पष्ट संदेश देऊ इच्छितो की बांगलादेशच्या लोकांच्या अपेक्षा आणि गरजांनुसार चर्चेद्वारे (नवीन गंगा) करार त्वरित अंमलात आणला पाहिजे," असे त्यांनी सांगितले.

# सरन्यायाधीश सूर्यकांत यांचे स्पष्टीकरण

### तरुणांवर नव्हे, बनावट पदवीधारकांवर टीका केली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : बेरोजगार तरुणांबाबत 'झुरळ' टिप्पणी केल्याच्या वादानंतर भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्टीकरण दिले आहे. आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचे सांगत त्यांनी तरुणांवर टीका केलेली नसल्याचे स्पष्ट केले.

शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी केलेल्या तोंडी निरीक्षणांवरून सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला होता. बेरोजगार तरुण झुरळांसारखे होतात आणि नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा माहिती अधिकार कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर टीका करतात, असा त्यांच्या वक्तव्याचा अर्थ लावण्यात आला होता. सरन्यायाधीशांनी भूमिका स्पष्ट केली. "माझ्या तोंडी निरीक्षणांचा चुकीचा अर्थ लावला गेला, हे पाहून मला वेदना होत आहेत," असे त्यांनी म्हटले. माध्यमांनी वक्तव्याचा चुकीचा संदर्भ दिल्याचा आरोपही त्यांनी केला.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, त्यांची टीका बेरोजगार तरुणांवर नव्हती, तर बनावट पदव्या घेऊन वकिली व्यवसायात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींवर होती. खोट्या आणि बनावट पदव्यांच्या आधारे वकिलीसारख्या क्षेत्रात येणाऱ्या लोकांवर आपण भाष्य केले होते, असे त्यांनी सांगितले. "अशाच प्रकारचे काही लोक मीडिया, सोशल मीडिया आणि इतर सन्माननीय क्षेत्रांतही शिरले आहेत. त्यामुळे मी त्यांना परजीवी म्हटले," असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले.

सरन्यायाधीशांनी भारतातील तरुणांविषयी आदर व्यक्त केला. "देशाचे तरुण हे विकसित भारताचे आधारस्तंभ आहेत. मला भारताच्या आजच्या आणि उद्याच्या युवा शक्तीचा अभिमान आहे," असेही त्यांनी म्हटले.

### भूगोलात राहायचे की इतिहासात हे त्यांनी ठरवावे

# लष्करप्रमुखांचा पाकिस्तानला कठोर शब्दांत इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले होते. या कारवाईत नियंत्रण रेषेजवळील दहशतवादी तळांसह पाकिस्तानमधील प्रमुख प्रशिक्षण केंद्रे उद्ध्वस्त करण्यात आली होती. मात्र, पाकिस्तानकडून पुन्हा भारतविरोधी कारवायांना खतपाणी घालण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे गुप्तचर अहवालातून समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी पाकिस्तानला कठोर इशारा दिला आहे.

नवी दिल्लीतील मानेकशॉ सेंटर येथे आयोजित 'सेना संवाद' कार्यक्रमात जनरल द्विवेदी बोलत होते. ऑपरेशन सिंदूरसारखी परिस्थिती पुन्हा निर्माण झाल्यास भारतीय लष्कराची भूमिका काय असेल, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना त्यांनी पाकिस्तानला सूचक शब्दांत इशारा दिला. "पाकिस्तानने ठरवावे की त्यांना भूगोलाचा भाग राहायचे आहे की इतिहासाचा," असे जनरल द्विवेदी म्हणाले. पाकिस्तानने दहशतवाद्यांना आश्रय देणे आणि भारतविरोधी कारवायांना पाठबळ देणे सुरूच ठेवले, तर त्याचे परिणाम गंभीर असतील, असा संदेश त्यांनी या विधानातून दिला.

पहलगाममध्ये पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला होता. या घटनेनंतर भारताने सात मे दोन हजार पंचवीस रोजी 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले. भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये अचूक कारवाई करत दहशतवादी तळ आणि प्रशिक्षण केंद्रे नष्ट केली. यानंतर पाकिस्तानने भारतावर हवाई हल्ल्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तानच्या विविध हवाई तळांवर भेदक हल्ले केले. या कारवाईत पाकिस्तानच्या काही हवाई तळांचे मोठे नुकसान झाले. अवघ्या अठ्ठ्याऐंशी तासांत भारताने पाकिस्तानला लष्करीदृष्ट्या मोठा धक्का दिला. अखेर पाकिस्तानने भारताशी संपर्क साधत युद्धबंदीची विनंती केली. त्यानंतर भारताने पाकिस्तानचा प्रस्ताव स्वीकारला आणि दहा मे दोन हजार पंचवीस रोजी लष्करी संघर्ष स्थगित झाला.ऑपरेशन सिंदूरच्या पहिल्या वर्धापन दिनानंतर झालेल्या या कार्यक्रमात लष्करप्रमुखांनी दिलेला इशारा महत्त्वाचा मानला जात आहे. पाकिस्तानकडून दहशतवादाला पाठबळ सुरूच राहिल्यास भारत यापुढेही कठोर आणि निर्णायक प्रत्युत्तर देईल, असा स्पष्ट संदेश या विधानातून देण्यात आला आहे.

# नीट पेपरफुटी प्रकरणी आणखी एका प्राध्यापिकेला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : 'नीट-युजी' परीक्षेतील गैरव्यवहारप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने तपास अधिक वेगाने सुरू केला असून शनिवारी जीवशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका मनीषा मांढरे यांना अटक करण्यात आली. नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या गोपनीय समितीत त्यांचा समावेश होता.

मनीषा मांढरे यांची दिल्लीतील सीबीआय मुख्यालयात प्रदीर्घ चौकशी करण्यात आली. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. एनटीएने त्यांची विषयतज्ज्ञ म्हणून नियुक्ती केली होती. वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या प्रक्रियेत त्यांचा थेट सहभाग होता, अशी माहिती तपास यंत्रणेकडून देण्यात आली आहे.

सीबीआयच्या तपासानुसार, वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्र या विषयांच्या प्रश्नपत्रिका हाताळण्याची जबाबदारी मांढरे यांच्याकडे होती. या अधिकारांचा गैरवापर करून त्यांनी काही विद्यार्थ्यांशी संपर्क साधल्याचा आरोप आहे. चौदा मे रोजी अटक करण्यात आलेल्या मनीषा वाघमारे यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. एप्रिल २०२६ मध्ये पुण्यातील घरी निवडक विद्यार्थ्यांसाठी खासगी शिकवणी घेतल्याचा आरोप मांढरे यांच्यावर आहे. या शिकवणीत विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये घेऊन परीक्षेपूर्वीच प्रश्न आणि उत्तरे सांगण्यात आली, असा सीबीआयचा दावा आहे. ३ मे रोजी झालेल्या मुख्य परीक्षेत हेच प्रश्न आल्याचे तपासात आढळल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## संपादकीय

# मुत्सद्देगिरीचा सुवर्णअध्याय!



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संयुक्त अरब अमिराती दौऱ्याने जागतिक मुत्सद्देगिरीत भारताच्या सामर्थ्यावर ठळक मोहोर उमटवली आहे. राष्ट्र प्रथम हे सूत्र उराशी बाळगून गेल्या दशकाभरात भारताने आपले परराष्ट्र धोरण अत्यंत आक्रमक व संयत पद्धतीने राबवले असून, त्याचे अभूतपूर्व यश आज संपूर्ण जग उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संयुक्त अरब अमिराती दौऱ्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात आणि जागतिक मुत्सद्देगिरीत भारताच्या वाढत्या वर्चस्वावर पुन्हा एकदा ठळक मोहोर उमटवली आहे. 'राष्ट्र प्रथम' हे सूत्र उराशी बाळगून गेल्या दशकाभरात भारताने आपले परराष्ट्र धोरण ज्या आक्रमक आणि तितक्याच संयत पद्धतीने राबवले आहे, त्याचे अभूतपूर्व यश आज संपूर्ण जग उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. एकेकाळी एकांगी तेल खरेदीपुरते मर्यादित असलेले भारत आणि आखाती देशांचे संबंध आज सामरिक भागीदारी, अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या अत्युच्च शिखरावर पोहोचले आहेत. युएईसारख्या राष्ट्राने भारतासोबत केलेले ताजे संरक्षण करार, ऊर्जा सुरक्षेची हमी आणि व्यापारवृद्धीचे निर्णय हे नव्या, सशक्त आणि आत्मनिर्भर भारताच्या जागतिक ताकदीचे जिवंत प्रतीक आहेत. आज पाकिस्तान भिकेचा कटोरा घेऊन आखाती देशांच्या दारात उभा असताना, युएईचे नेतृत्व पंतप्रधान मोदींना आदराने आलिंगन देत आहे. हा कोणत्याही अर्थाने निव्वळ दोन नेत्यांमधील वैयक्तिक संवाद नाही, तर ती जागतिक पटलावर भारताने मिळवलेली एक अतुलनीय वैचारिक आणि धोरणात्मक विजयश्री आहे. या दौऱ्यात झालेले करार हे भारताच्या भविष्यातील अर्थकारणाची आणि सुरक्षेची दिशा ठरवणारे आहेत. विशेषतः दोन्ही देशांमध्ये झालेला संरक्षण विषयक करार हा निव्वळ शस्त्रास्त्रांच्या खरेदी-विक्रीपुरता मर्यादित नाही. अरबी समुद्र आणि हिंदी महासागर क्षेत्रात वाढता समुद्री चाच्यांचा धोका, दहशतवाद आणि प्रादेशिक अस्थिरता पाहता, भारत आणि युएई यांनी सागरी सुरक्षा आणि सामरिक सहकार्यासाठी घेतलेला पुढाकार अत्यंत महत्त्वाचा आहे. या करारामुळे भारताच्या पश्चिम किनारपट्टीची सुरक्षा अधिक भक्कम होणार आहे. या दौऱ्यातील सर्वात धोरणात्मक आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे भारताची भविष्यातील ऊर्जा सुरक्षा. युएईने अलीकडच्या काळात 'ओपेक' आणि 'ओपेक प्लस' या तेल उत्पादक देशांच्या कार्टेलमधून बाहेर पडत किंवा स्वतःच्या अटींवर आर्थिक विविधीकरणाचा जो धोरणात्मक मार्ग निवडला आहे, तो अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा अत्यंत मोक्याच्या क्षणी भारताने युएईसोबत 'धोरणात्मक पेट्रोलियम साठा' आणि ऊर्जेच्या क्षेत्रातील दीर्घकालीन करार करून आपली दूरदृष्टी सिद्ध केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत होणारे चढउतार थेट देशाच्या महागाईवर परिणाम करतात. युएईच्या या बदलत्या जागतिक भूमिकेचा आणि वाढत्या उत्पादन क्षमतेचा थेट फायदा भारताला होणार असून, आपत्कालीन परिस्थितीसाठी देशांतर्गत इंधनाचे भव्य साठे निर्माण करण्यास युएईचे आर्थिक आणि तांत्रिक पाठबळ लाभणार आहे. या दौऱ्याने देशासाठी गुंतवणुकीची एक मोठी सुवर्णसंधी खुली केली आहे. युएईकडून भारतात विविध पायाभूत सुविधा आणि ऊर्जा प्रकल्पांमध्ये होणारी ५ अब्ज डॉलर्सची थेट गुंतवणूक ही भारतीय अर्थव्यवस्थेवरील जागतिक विश्वासाची पावती आहे. त्याचबरोबर, दोन्ही देशांनी स्थानिक चलनात (रुपया आणि दिरहाम) व्यापार वाढवण्याचा घेतलेला निर्णय हा अमेरिकन डॉलरच्या जागतिक मक्तेदारीला दिलेला एक मोठा धक्का आहे. लाखो भारतीय नागरिक युएईमध्ये वास्तव्याला आहेत आणि ते देशात अब्जावधी रुपयांचे परकीय चलन पाठवत असतात. या नव्या करारांमुळे आणि भारताच्या 'युपीआय' प्रणालीला मिळालेल्या मान्यतेमुळे या भारतीयांचा पैसा वाचेलच, पण त्याचबरोबर दोन्ही देशांतील आयात-निर्यातदार आणि व्यापारी वर्गालाही याचा मोठा आर्थिक लाभ मिळेल. अर्थकारण आणि राजकारणाच्या पलीकडे जाऊन, या दौऱ्याने सांस्कृतिक राष्ट्रवादाचाही एक नवा अध्याय रचला आहे. अबु धाबीसारख्या राजवटीच्या केंद्रस्थानी उभारले गेलेले भव्य 'स्वामीनारायण हिंदू मंदिर' हे साधे प्रार्थनास्थळ नसून, ते भारतीय सनातन संस्कृतीच्या सहिष्णुतेचे आणि वैश्विक मान्यतेचे सर्वोच्च प्रतीक आहे. पंतप्रधान मोदींचा हा युएई दौरा म्हणजे स्वातंत्र्याच्या अमृतकाळात भारताने जागतिक महासत्तेच्या देशाने टाकलेले एक अत्यंत भक्कम पाऊल आहे. आजचा भारत हा कोणाच्याही दबावाखाली न झुकणारा, आपल्या राष्ट्रीय हितांशी कोणतीही तडजोड न करणारा आणि जगाला शांततेचा व सहकार्याचा नवा मार्ग दाखवणारा 'विश्वगुरू' म्हणून उदयाला येत आहे. हेच यातून अधोरेखित झाले आहे.

# पारदर्शकतेचा अस्त आणि 'झुरळांचा' बहाणा!

**» माहितीचा अधिकार हा लोकशाहीच्या पारदर्शकतेचा मोठा आधारस्तंभ मानला जातो. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायपीठाने काही माहिती अधिकार कार्यकर्त्यांची तुलना 'झुरळां'शी करत त्यांच्या प्रवृत्तीवर ओढलेले ताशेरे ही गंभीर बाब आहे.**




सर्वोच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण सुनावणीदरम्यान न्यायपीठाने माहितीचा अधिकार (आरटीआय) वापरून प्रशासकीय अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करणाऱ्या कथित कार्यकर्त्यांचा उल्लेख 'झुरळे' (कॉकरोचेस) असा केला. मुळात, खंडणीखोरीसाठी कायद्याचा गैरवापर करणाऱ्या प्रवृत्तींबद्दल देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने संताप व्यक्त करणे अगदी स्वाभाविक आहे. गेल्या काही वर्षांत गल्लोगल्ली असे 'माहिती अधिकार कार्यकर्ते' नावाचे अनेक उपद्रवी गट तयार झाले आहेत, ज्यांचा मुख्य उद्देश जनहित नसून प्रशासकीय अधिकाऱ्यांना वेठीस धरून स्वतःची आर्थिक पोळी भाजून घेणे हाच असतो. अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई व्हायलाच हवी आणि त्यांना कायद्याचा बडगा दाखवायलाच हवा, याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. परंतु, या मूठभर अपप्रवृत्तींचे निमित्त करून संपूर्ण माहिती अधिकार चळवळीला आणि या क्रांतिकारी कायद्याच्या मूळ हेतूलाच संशयाच्या भोवऱ्यात उभे करणे, हे अधिक धोकादायक आहे. जेव्हा देशाची सर्वोच्च न्यायव्यवस्था अशा प्रकारची अत्यंत कडक आणि काहीशी आक्षेपार्ह टिप्पणी करते, तेव्हा त्याचा थेट फायदा कोणाला होतो आणि व्यवस्थेतील कोणते घटक या विधानांवरून स्वतःच्या चुकांवर पांघरूण घालतात, याचा विचार गांभीर्याने करण्याची वेळ आता आली आहे.

दोन दशकांपूर्वी जेव्हा माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात आला, तेव्हा तो निव्वळ कागदावरील एक दस्तऐवज नव्हता; तर तो सामान्य नागरिकांच्या हातातील एक अमोघ अस्त्र होता. लालफितीच्या कारभारात आणि सरकारी कार्यालयांच्या अंधाऱ्या खोल्यांमध्ये धूळ खात पडलेल्या फायली या कायद्यामुळे थेट उजेडात येऊ लागल्या. सत्ताधारी नेते, बेजबाबदार नोकरशहा आणि भ्रष्ट कंत्राटदार यांच्या अभेद्य साखळीला या कायद्याने पहिला मोठा हादरा दिला. आदर्श घोटाळा असो, २-जी स्पेक्ट्रम घोटाळा असो किंवा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील गैरव्यवहार असोत; देशाच्या राजकारणाला दिशा देणारी आणि भ्रष्टाचाराची पाळेमुळे खणून काढणारी अनेक महाकाय प्रकरणे याच कायद्यामुळे चव्हाट्यावर आली.

कोणत्याही कायद्याचा गैरवापर होतो, हे एक सार्वत्रिक सत्य आहे. हुंड्याविरोधातील कायदा, अॅट्रॉसिटी कायदा किंवा अलीकडच्या काळात तपास यंत्रणांकडून सर्रास वापरला जाणारा 'पीएमएलए' कायदा; या सर्वांचाच कमी-अधिक गैरवापर होताना आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो. परंतु, म्हणून हे कायदेच रद्द करावेत किंवा त्यातील मूळ तरतुदीच कुचकामी ठरवाव्यात, असा युक्तिवाद कोणीही शहाणा माणूस करत नाही. मग हाच न्याय माहितीच्या अधिकाराला का लावला जात नाही? सर्वोच्च न्यायालयाचे हे ताजे निरीक्षण एका विशिष्ट प्रकरणापुरते मर्यादित असले, तरी त्याचे पडसाद अत्यंत दूरगामी आणि भयंकर आहेत. या एका विधानामुळे देशातील हजारो प्रामाणिक आणि निःस्वार्थ आरटीआय कार्यकर्त्यांच्या मनोधैर्यावर मोठा आघात झाला आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षांत देशात शंभरहून अधिक माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या निर्घृण हत्या झाल्या आहेत. त्यांच्या या बलिदानाचा विसर प्रस्थापित व्यवस्थेला इतक्या सहज पडू नये. आज माहिती अधिकार कायदा आधीच 'व्हेंटिलेटर'वर मृत्यूची घटका मोजत आहे. माहिती आयुक्तांच्या रिक्त जागा वर्षानुवर्षे न भरणे, कायद्यात वारंवार दुरुस्त्या करून सरकारला सोयीचे बदल करणे आणि सामान्य नागरिकांना माहिती नाकारण्यासाठी नवनवीन पळवाटा शोधणे, असे धक्कादायक प्रकार राजरोसपणे सुरू आहेत. कोणत्याही लोकशाहीत अंधार हा कधीही एका रात्रीत दाटून येत नाही; तो हळूहळू, टप्प्याटप्प्याने आणि कायदेशीर मार्गांनीच पसरवला जातो. इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून राजकीय पक्षांना मिळालेला हजारो कोटींचा बेहिशेबी निधी असो किंवा इतर कोणत्याही फंडातील व्यवहारांची गुप्तता असो; आजच्या सत्ताधाऱ्यांना पारदर्शकता नकोच आहे. या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयासारख्या संस्थेने अधिक सजग आणि तटस्थ राहून नागरिकांच्या या मूलभूत अधिकाराचे रक्षण करणे अपेक्षित असते. व्यवस्थेतील अंधार उजेडात आणणाऱ्या 'झुरळां'वरच 'पेस्ट कंट्रोल' करण्याची भाषा करणे, हा निव्वळ बौद्धिक आणि न्यायिक आळस आहे. चुकीच्या प्रवृत्तींना आणि खंडणीखोरांना ठेचलेच पाहिजे, पण त्या प्रक्रियेत लोकशाहीच्या मुळावरच घाव घातला जाणार नाही, याचे भान ठेवणेही तितकेच आवश्यक आहे. अन्यथा, पारदर्शकतेचा हा पद्धतशीर अस्त सामान्य नागरिकांच्या स्वातंत्र्यासाठी कायमचा काळोख घेऊन येईल, हे नक्की! न्यायव्यवस्थेने तरी किमान या वास्तवाकडे डोळेझाक करू नये, एवढीच अपेक्षा आजच्या घडीला व्यक्त करता येईल.

# ६० कोटींच्या बोगस उपसूचना घोटाळ्याचा अहवाल शासनाकडे

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची माहिती

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेत बोगस उपसूचनांच्या आधारे ठेकेदारांना परस्पर ६० कोटी १८ लाख रुपयांची बिले अदा करण्यात आल्याचे प्रकरण आता राज्य सरकारच्या पातळीवर पोहोचले आहे. या प्रकरणाशी संबंधित सविस्तर चौकशी अहवाल राज्य शासनाकडे पाठवण्यात आला असून, पुढील निर्णय शासनस्तरावर घेतला जाईल, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शुक्रवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत दिली. त्यामुळे या कथित आर्थिक गैरव्यवहारात राज्य सरकार कोणती भूमिका घेते, याकडे पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.

महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत या प्रकरणावरून पुन्हा एकदा जोरदार खडाजंगी झाली. जनतेच्या पैशांशी संबंधित एवढ्या मोठ्या प्रकरणाची संपूर्ण माहिती लोकप्रतिनिधींसमोर ठेवली पाहिजे, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सुलभा उबाळे यांनी केली. चौकशी अहवाल सभागृहात सादर केल्यास सत्य समोर येईल आणि पारदर्शकता राखली जाईल, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नगरसेवक



संदीप वाघेरे यांनी या कथित घोटाळ्यासाठी सत्ताधारी पक्षाला जबाबदार धरले. त्यावर सभागृह नेते प्रशांत शितोळे यांनी पलटवार करत पूर्वीच्या कार्यकाळात विरोधी सदस्यही सत्तेचा भाग होते, त्यामुळे केवळ सध्याच्या सत्ताधाऱ्यांना दोष देणे योग्य नाही, असे म्हटले. दोषींवर कारवाई करून हे प्रकरण एकदाचे निकाली काढावे, अशी भूमिकाही त्यांनी मांडली.

प्रशासनाच्या वतीने सभागृहात माहिती देताना आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी संबंधित अहवाल दोन दिवसांपूर्वी राज्य शासनाकडे पाठवण्यात आल्याचे स्पष्ट केले. चौकशी, कारवाई अथवा इतर प्रशासकीय निर्णय आता शासनस्तरावरच घेतले जातील, असे त्यांनी सांगितले. गेल्या काही दिवसांपासून या आर्थिक घोटाळ्यावरून शहराचे राजकारण तापले आहे. विरोधक या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची मागणी सातत्याने करत असून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणीही त्यांनी लावून धरली आहे.

मात्र आयुक्तांच्या खुलाशानंतर महापालिका प्रशासन आणि सत्ताधारी भाजप पुन्हा एकदा संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

सभागृहात नगरसेवकांनी चौकशी अहवाल सादर करण्याची आग्रही मागणी केली. मात्र आयुक्तांनी हा अहवाल सभागृहात सादर करण्यास स्पष्ट नकार दिला. हा प्रशासकीय अहवाल असून तो राज्य सरकारला पाठवण्यात आला आहे. त्यावर सरकारच निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले. तथापि, हा अहवाल लवकरच महापौरांना सादर केला जाईल, अशी ग्वाहीही आयुक्तांनी सभागृहाला दिली. त्यामुळे अहवाल सभागृहापासून दूर ठेवण्यामागे नेमके कारण काय, असा प्रश्न विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणात मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांच्यावर कारवाई करता येत नाही, असे आयुक्तांनी यापूर्वी स्थायी समिती सभेत स्पष्ट केले होते. मात्र लेखा विभागातील तसेच इतर विभागांतील अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित ठेकेदारांवर कारवाई करणे महापालिका आयुक्तांच्या अधिकारात आहे. महापालिकेचे प्रमुख म्हणून दोषींवर तातडीने कारवाई करणे अपेक्षित असताना संपूर्ण जबाबदारी राज्य शासनावर ढकलून आयुक्तांनी या प्रकरणातून अंग काढून घेण्याची भूमिका घेतल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे.

# नाशिक फाटा उड्डाण पुलाला पडतोय अंधाराचा विळखा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा समजला जाणारा वाकड-भोसरी बीआरटीएस मार्ग सध्या अंधाराच्या विळख्यात सापडला आहे. नाशिक फाटा येथील जेआरडी टाटा उड्डाण पुलावरील दुभाजकामधील पथदिवे काही दिवसांपासून बंद असल्याने रात्रीच्या वेळी संपूर्ण पुलावर भीषण अंधार पसरत आहे. त्यामुळे हजारो वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपघातांचा धोका वाढला आहे.

नाशिक फाटा चौक हा पुणे-नाशिक महामार्गासह पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांना जोडणारा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. या पुलावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने प्रवास करतात. पुलावरील पथदिवे बंद असल्याने वाहनचालकांना योग्य अंदाज येत नाही. रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनांच्या तीव्र हेडलाईटमुळे दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. हा अंधार वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहे.

प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी करूनही या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला आहे. इतक्या महत्त्वाच्या उड्डाण पुलावर पथदिवे बंद असणे ही गंभीर बाब असून, प्रशासनाने उपाययोजना करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

# शहरात १.६२ लाख पाठ्यपुस्तकांची मागणी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने समग्र शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी बालभारतीकडे १ लाख ६२ हजार ६९ पाठ्यपुस्तकांची मागणी केली आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताच विद्यार्थ्यांच्या हातात नवी कोरी पुस्तके मिळावीत, यासाठी महापालिकेने आगाऊ नियोजन सुरू केले आहे.

दरवर्षी १५ जूनपासून शाळा सुरू होत असल्याने शालेय साहित्य खरेदी आणि वितरणाची तयारी महापालिका शिक्षण विभागाने वेगाने सुरू केली आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके मिळावीत, असा विभागाचा प्रयत्न आहे. महापालिकेच्या अखत्यारीतील शाळांमध्ये नवीन शैक्षणिक सत्राच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात पाठ्यपुस्तके देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत दरवर्षी महापालिका, अनुदानित, विनाअनुदानित, खासगी, शासकीय आणि आश्रमशाळांमधील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. याच अनुषंगाने यंदाही विद्यार्थ्यांची संख्या, माध्यमनिहाय गरज आणि शाळांकडून आलेल्या मागणीच्या आधारे पाठ्यपुस्तकांची मागणी बालभारतीकडे नोंदवण्यात आली आहे. यामध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी १ लाख ११ हजार ४६६ पुस्तकांची मागणी करण्यात आली आहे. तसेच सेमी इंग्रजी माध्यमातील इयत्ता पहिली ते आठवीच्या चार शाळांतील विद्यार्थीसंख्येनुसार ५० हजार ६०३ पुस्तकांची स्वतंत्र मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे एकूण मागणी १ लाख ६२ हजार ६९ पुस्तकांवर पोहोचली आहे. आकुर्डी आणि पिंपरी शहर साधन केंद्रांतर्गत येणाऱ्या सर्व महापालिका शाळा, खासगी, अनुदानित, शासकीय आणि आश्रमशाळांनी इयत्ता पहिली ते आठवीसाठी मराठी, हिंदी, उर्दू आणि सेमी इंग्रजी माध्यमातील पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदवली आहे. या मागणीनुसार जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पाठ्यपुस्तके प्राप्त होण्याची शक्यता आहे. पुस्तके वेळेत उपलब्ध झाल्यास शाळा सुरू होण्यापूर्वीच त्यांचे वर्गनिहाय आणि शाळानिहाय वितरण करता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच अभ्यासक्रमानुसार शिक्षण सुरू करता येईल. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तके वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके देण्याची परंपरा कायम ठेवण्यासाठी शिक्षण विभागाकडून नियोजन केले जात आहे. वितरणात विलंब होऊ नये, यासाठी शाळांकडून आलेली माहिती संकलित करून बालभारतीकडे मागणी पाठवण्यात आली आहे. आता पुस्तके वेळेत उपलब्ध होऊन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, हे शिक्षण विभागासमोरील पुढील महत्त्वाचे आव्हान असणार आहे.

## १५ जूनचा मुहूर्तही टळण्याची चिन्हे स्पष्ट; प्रवाशांमध्ये नाराजी

# हिंजवडी मेट्रो प्रकल्प पुन्हा एकदा विलंबाच्या भोवऱ्यात

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पुणेकरांसाठी, विशेषतः आयटी क्षेत्रातील लाखो नोकरदारांसाठी महत्त्वाचा ठरणारा हिंजवडी ते शिवाजीनगर पुणे मेट्रो मार्ग ३ प्रकल्प पुन्हा एकदा विलंबाच्या भोवऱ्यात अडकण्याची चिन्हे दिसत आहेत. प्रशासनाकडून १५ जूनपासून प्रवासी सेवा सुरू करण्याचे संकेत दिले जात असले, तरी प्रत्यक्ष कामाची सद्यस्थिती पाहता हा मुहूर्त पुन्हा हुकण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे आयटी कॉरिडॉरमधील प्रवाशांमध्ये नाराजी वाढू लागली आहे.



८ हजार ३१३ कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची अंमलबजावणी पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडमार्फत केली जात आहे. हिंजवडी, वाकड, बालेवाडी, औंध आणि शिवाजीनगर या महत्त्वाच्या भागांना जोडणारी ही मार्गिका पुणे महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र, प्रकल्पाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मोठा असला, तरी प्रत्यक्ष भौतिक कामे अद्याप पूर्णत्वास गेलेली नाहीत.

उपलब्ध आकडेवारीनुसार, मे अखेरपर्यंत प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी तब्बल ९७.४० टक्के निधी खर्च झाला आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाची प्रगती ९४.५८ टक्क्यांवर पोहोचली आहे. त्यामुळे निधी खर्च आणि कामाची गती यामध्ये तफावत असल्याचे स्पष्ट होत आहे. खर्च जवळपास पूर्णत्वास गेला असताना काम मात्र अद्याप अपूर्ण असल्याने प्रकल्प व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पहिल्या टप्प्यात हिंजवडीकडील १२ स्थानके सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये मेगापोलिस सोसायटी, क्वाड्रॉन बिझनेस पार्क, इन्फोसिस फेज-२, विप्रो, वाकड चौक आणि बालेवाडी स्टेडियम यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांचा समावेश आहे. आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ही स्थानके अत्यंत उपयुक्त ठरणार होती. मात्र, अनेक ठिकाणी अंतिम चाचण्या, प्रवासी सुविधा, सुरक्षा तपासणी आणि तांत्रिक कामे अद्याप पूर्ण झालेली नसल्याने प्रवासी सेवा सुरू होण्यास आणखी विलंब होण्याची शक्यता आहे.

हिंजवडी ते शिवाजीनगर ही २३.२०३ किलोमीटर लांबीची मेट्रो मार्गिका पुणे शहरातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या पट्ट्यांपैकी एकाला पर्याय देणारी मानली जाते. हिंजवडी आयटी पार्कमध्ये दररोज लाखो कर्मचारी ये-जा करतात. सध्या या मार्गावर खासगी वाहने, बस आणि कंपनी कॅबवर मोठा ताण आहे. वाकड, बाणेर, बालेवाडी, औंध आणि गणेशखिंड मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा मोठा वेळ वाया जातो. त्यामुळे या मेट्रो मार्गिकेकडून पुणेकरांना मोठ्या अपेक्षा आहेत. मात्र, प्रकल्पातील सततचा विलंब प्रवाशांच्या संयमाची परीक्षा घेत आहे.

यापूर्वीही प्रवासी सेवा सुरू करण्याबाबत वेगवेगळे अंदाज व्यक्त करण्यात आले होते. पण प्रत्यक्षात कामे पूर्ण न झाल्याने सेवा सुरू होऊ शकली नाही. आता १५ जूनचा संभाव्य मुहूर्तही अनिश्चित मानला जात आहे.

# महिला एपीआयला लाचप्रकरणी अटक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : गुन्ह्यात मदत करणे, नातेवाईकांची अटक टाळणे आणि दोषारोपपत्र लवकर दाखल करण्याच्या मोबदल्यात लाचेची मागणी केल्याप्रकरणी बावधन पोलीस ठाण्यातील महिला सहाय्यक पोलीस निरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून अटक केली. ज्योती पांडुरंग तांबे (वय ४१) असे अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २९ वर्षीय तक्रारदार आणि त्यांच्या नातेवाईकांविरुद्ध बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्योती तांबे यांच्याकडे होता. तपासात मदत करणे, तक्रारदाराच्या नातेवाईकांना अटक होऊ न देणे आणि न्यायालयात दोषारोपपत्र लवकर दाखल करण्यासाठी तांबे यांनी तक्रारदाराकडे ५० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने १२ मार्च रोजी पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर एसीबीने १२ आणि १७ मार्च रोजी पडताळणी केली. या पडताळणीत ज्योती तांबे यांनी यापूर्वीच तक्रारदाराकडून ५० हजार रुपये स्वीकारल्याचे निष्पन्न झाले. तसेच उर्वरित रकमेपैकी काही रक्कम कमी करून पुन्हा पैशांची मागणी केल्याचेही स्पष्ट झाल्याचे एसीबीकडून सांगण्यात आले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र



## सारांश वृत्त

### वायरमनला विजेचा धक्का

**उरुळी कांचन :** विद्युत रोहित्रावर दुरुस्तीचे काम करत असताना महावितरणच्या एका वायरमनला विजेचा तीव्र धक्का लागल्याची खळबळजनक घटना घडली. शॉक लागल्यामुळे वायरमन सुमारे १५ ते २० फुटांच्या उंचीवरून थेट जमिनीवर कोसळले असून, ते गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. शिंदवणे, ता. हवेली ग्रामपंचायत हद्दीतील काळेशिवार परिसरात शनिवारी, दि. १६ रोजी सायंकाळी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, संजय भोसले असे जखमी झालेल्या वायरमनचे नाव आहे. शनिवारी सायंकाळी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास काळेशिवार परिसरात विद्युत पुरवठा खंडित झाल्याने किंवा तांत्रिक बिघाड झाल्याने भोसले हे दुरुस्तीसाठी विद्युत रोहित्रावर चढले होते. मात्र, काम करत असताना अचानक त्यांचा विद्युत वाहिनीशी संपर्क आला आणि त्यांना जोराचा विजेचा धक्का बसल्याची माहिती मिळत आहे. विजेचा धक्का लागताच संजय भोसले यांचा तोल गेला आणि ते १५ ते २० फुटांवरून थेट जमिनीवर कोसळले. घटना घडताच स्थानिक नागरिकांनी रुग्णवाहिकेशी संपर्क साधला. ग्रामस्थांच्या मदतीने जखमी संजय भोसले यांना उरुळी कांचन येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

### पैसे मागितल्याने मालकाला मारहाण

**उरुळी कांचन :** हॉटेल भाड्याचे पैसे मागितल्याच्या कारणावरून हॉटेल चालक आणि त्यांच्या साथीदारांनी मिळून हॉटेल मालकाला आणि त्यांच्या भावाला लाकडी दांडक्याने व दगडाने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अजित अनिल कड (वय २९, व्यवसाय शेती रा. कडवस्ती, सोरतापवाडी ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

---

### नितीन गडकरी यांचे आश्वासन; पृथ्वीराज जाचक मागणीवर ठाम

# महामार्गाच्या तांत्रिक बाजू तपासणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या कामाबाबत तांत्रिक बाबी तपासून निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे होत नसल्यामुळे ठिकठिकाणी बंद पाडण्यात आले आहे. या रखडलेल्या कामाची गडकरी यांनी शुक्रवारी दि. १५ पाहणी केली. ग्रामस्थांना विश्वासात न घेतल्याने तसेच ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे मागील तीन-चार वर्षांपासून पालखी महामार्गाचे काम रखडले आहे.

भवानीनगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या समोर पूल उभारण्याचे काम सुरू असून, या पुलामुळे कारखान्याचे नुकसान होत असल्याचे कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले. रस्त्याच्या अडचणींवर मार्ग काढण्यास मदत करा, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर तांत्रिक बाबी तपासून रस्त्याच्या कामाबाबत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन गडकरी यांनी जाचक यांना दिले.

पृथ्वीराज जाचक म्हणाले, "प्रकल्प करत असताना प्रत्येक गावात ग्रामसभा घ्यायला पाहिजे होती. नको त्या ठिकाणी साईड गटारांची उंची वाढविल्याने प्रकल्पाची किंमत वाढली आहे. या पुलामुळे कारखान्याचे विभाजन होणार असून, उसाने भरलेले ट्रॅक्टर कारखान्यात येऊ शकणार नाहीत. सेवा रस्त्यावरील पुलाची उंची वाढवल्याने बैलगाडीने येणारा ऊसही कारखान्यात येऊ शकणार नाही. तीन लाख लोकांचा प्रपंच श्री छत्रपती कारखान्यावर अवलंबून आहे." ते म्हणाले, "पालखी येण्यासाठी एक महिना राहिला आहे. एका महिन्यात रस्त्याचे काहीच काम होणार नाही. पालखी सोहळा संपल्यानंतर पूर्ण नियोजन करून पालखी महामार्गाचे काम करावे. नको त्या ठिकाणी पूल आणि अंडरपास झाले आहेत. कारखान्याच्या पाठीमागून दुसरा मार्ग काढता येणार आहे. या पुलामुळे शासनाचे झालेले नुकसान कारखान्याचे स्वाभिमानी सभासद उसातून भरून देतील. आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, नितीन गडकरी, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना याविषयी विनंती करू. मात्र, तरीही हा प्रकल्प जबरदस्तीने करण्याचा प्रयत्न केला, तर मी स्वतः तुरुंगात जाईन; पण कारखान्याचे नुकसान करणारा पूल होऊ देणार नाही."

---

# उन्हाचा तडाखा वाढला; झाडेही झाली निश्चल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतुर :** मे महिन्याच्या मध्यातच उन्हाने अक्षरशः कहर केला असून, जुन्नर तालुक्यासह ग्रामीण भागात उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सकाळी दहा वाजल्यानंतरच सूर्य आग ओकू लागल्याने दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. कडक उन्हामुळे माणसांसोबतच जनावरे, पक्षी आणि झाडेसुद्धा निश्चल झाल्याचे चित्र सध्या गावागावांत दिसून येत आहे.

दुपारच्या वेळी गावातील चौक, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणे ओस पडत असून, अत्यावश्यक कामाशिवाय नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि उन्हात काम करणाऱ्या कष्टकरी वर्गाला या उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत आहे. डोक्यावर टोपी, गमछा, चेहऱ्यावर रुमाल आणि हातात पाण्याच्या बाटल्या घेऊन नागरिक उन्हाचा सामना करताना दिसत आहेत.

थंड पेये, उसाचा रस, लिंबूपाणी, ताक आणि आईस्क्रीमला मोठी मागणी वाढली आहे. दुपारच्या वेळेत गावातील पाणवठे आणि झाडांच्या सावलीत जनावरे विसावलेली दिसत आहेत. अनेक ठिकाणी पक्ष्यांसाठी पाण्याची भांडी ठेवण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. वैद्यकीय तज्ज्ञांनी नागरिकांना दुपारच्या वेळेत शक्यतो बाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. भरपूर पाणी पिणे, हलका आहार घेणे आणि उष्माघातापासून काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. पुढील काही दिवस उष्णतेची तीव्रता कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

---

# निरगुडसर येथील रस्त्याच्या कामाची दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** अवसरी खुर्द फाटा, ता. आंबेगाव ते जांबुत, ता. शिरूर या मार्गावरील सिमेंट-काँक्रीट रस्त्याच्या कामात निरगुडसर परिसरात सुमारे दीडशे मीटर अंतराचा रस्ता चार ते पाच फूट उंच करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या संदर्भातील "रस्ता चार फूट उंच, घरे मात्र खोलगट; निरगुडसरकरांच्या अडचणी वाढल्या" ही बातमी दै. राज्य लोकतंत्रमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे.

या प्रकरणी परिसरातील नागरिकांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेत राज्याचे माजी गृहमंत्री व स्थानिक लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांनी संबंधित रस्त्याच्या ठेकेदारांना तातडीने सूचना दिल्या होत्या. नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन रस्त्याचे काम नियोजनबद्ध व सुरक्षित पद्धतीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले होते.

दरम्यान, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांचे स्वीय सहाय्यक रामदास वळसे पाटील यांनी या संपूर्ण प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत संबंधित अधिकारी, प्रोजेक्ट मॅनेजर आणि ग्रामस्थ यांच्यात चर्चा घडवून आणली. नागरिकांच्या अडचणी प्रत्यक्ष अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आल्या. त्यानंतर अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणाची पाहणी करून रस्त्याच्या उंचावलेल्या भागामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येणार असल्याचे मान्य केले. पाहणीदरम्यान ग्रामस्थांनी उंचावलेल्या रस्त्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. रस्ता अचानक उंच केल्याने लगतची घरे पाच ते सहा फूट खोल गेल्यासारखी दिसत असून, नागरिकांना घरातून थेट रस्त्यावर येण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक वेळा दुचाकी घसरून किरकोळ अपघात झाल्याच्याही तक्रारी करण्यात आल्या. रस्त्याच्या कामात नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन पुढील कामे करण्यात यावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

---

# मॉडेल स्कूलची कामे दर्जाहीन असल्याचा आरोप

### खेड तालुका सरपंच परिषदेचे जिल्हा समन्वयक कुंडलिक कोहिनकर यांचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** पुणे जिल्हा परिषदेच्या 'मॉडेल स्कूल' उपक्रमांतर्गत खेड तालुक्यासह जिल्ह्यात सुरू असलेल्या काही शाळांच्या बांधकामाचा दर्जा निकृष्ट असून, या कामांमध्ये जिल्हा परिषदेतील दोन अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप खेड तालुका सरपंच परिषदेचे जिल्हा समन्वयक कुंडलिक कोहिनकर यांनी केला.

खेड पंचायत समितीच्या सभागृहात शुक्रवारी दि. १५ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हे आरोप केले. पुणे जिल्हा परिषदेच्या 'मॉडेल स्कूल' उपक्रमांतर्गत ३०३ शाळांमध्ये आधुनिक विज्ञान प्रयोगशाळा, सौरऊर्जेवर चालणारी यंत्रणा, स्मार्ट क्लासरूम, संगणक कक्ष, स्वच्छतागृह, वर्गखोल्यांचे नूतनीकरण, वाचनालये आणि इतर अत्याधुनिक सुविधा देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरणाऱ्या या 'मॉडेल स्कूल' उपक्रमातून पुणे जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. गुणवत्ता आणि सुविधा वाढीसाठी हे पाऊल उचलण्यात आले असून, त्यासाठी जिल्हा नियोजनातून तब्बल २३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

काही ठिकाणी या कामांना सुरुवात झाली आहे. मात्र, स्मार्ट स्कूलची कामे करताना ती निकृष्ट आणि दर्जाहीन होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कामे करताना गावातील सरपंच, शाळा समितीचे सदस्य यांच्याशी चर्चा न करता ती केली जात असल्याने त्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून कामांचा दर्जाही निकृष्ट आहे, असा आरोप खेड तालुका सरपंच परिषदेने केला आहे. याबाबत सरपंच परिषदेचे जिल्हा समन्वयक कुंडलिक कोहिनकर यांनी राजगुरुनगर येथे पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला खेड तालुका सरपंच परिषदेचे अध्यक्ष मनोहर पोखरकर, उपाध्यक्ष सीताराम गुजर, सचिव पंढरीनाथ कोहिनकर आणि चंद्रकांत भालेराव उपस्थित होते.

वाळद गावात स्मार्ट स्कूलचे काम दर्जाहीन सुरू आहे. ठेकेदाराचे याकडे लक्ष नाही. अनेकदा सांगूनही ते त्यांच्या मनमानीप्रमाणे काम करीत आहेत. तीन महिने झाले स्मार्ट स्कूलचे काम सुरू आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना बसायला जागा नाही. त्यामुळे त्यांच्या यावर्षीच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. सरपंच संघटनेकडून याबाबत जिल्हा परिषदेला लेखी पत्रव्यवहार सुरू आहे; मात्र त्याची दखल घेतली जात नाही, असे मनोहर पोखरकर, सरपंच, वाळद तथा अध्यक्ष, सरपंच परिषद, खेड तालुका यांनी म्हटले आहे.

---

# मुंबई डबेवाला धर्मशाळेच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** नूतन मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स चॅरिटी ट्रस्ट व मुंबई टिफिन बॉक्स सप्लायर्स असोसिएशन यांच्या वतीने तीर्थक्षेत्र आळंदी येथे मुंबई डबेवाला धर्मशाळेच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन मुंबईचे आमदार श्रीकांत भारतीय आणि खेड तालुक्याचे आमदार बाबाजीशेठ काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या ठिकाणी सुमारे एक कोटी पन्नास हजार रुपये खर्चून नवीन तीन मजली इमारत उभारण्यात येणार आहे. वारकरी परंपरा आणि सेवाभाव जपत आळंदी येथे धर्मशाळा उभारण्याचा उपक्रम संघटनेने हाती घेतला असून, या माध्यमातून वारकरी भाविक आणि चाकरमान्यांना मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, आळंदी नगर परिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, माजी नगराध्यक्ष राहुल चितळकर, पंचायत समितीचे माजी सभापती भगवान पोखरकर, पुणे जिल्हा दूध संघाचे माजी संचालक चंद्रशेखर शेटे, पंचायत समिती सदस्या सारिका गोगावले, बाजार समितीचे संचालक अनुराग जैद, खरेदी-विक्री संघाचे संचालक सतीश चांभारे, अॅड. अमृता गुरव, प्रिया पवार, संघटनेचे खजिनदार बारकू फापाळे, रामदास करवंदे, दिंडी मालक माधव रणपिसे, भीमाशंकर सेवा मंडळाचे अध्यक्ष गिरजूशेठ चांभारे, औंढेचे सरपंच प्रदीप शिंदे, वाजवणेचे माजी सरपंच चंद्रकांत आंद्रे यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी, सभासद आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुंबई डबेवाला संघटनेची स्थापना वाजवणे गावचे कै. महादू आवजी बच्चे यांनी सन १८८८ साली केली. संघटनेचे पहिले अध्यक्ष औदर गावचे कै. धोंडीभाऊ रामभाऊ मेदगे यांनी कामकाज पाहिले. गडद गावचे कै. गंगाराम तळेकर, रघुनाथ मेदगे आणि सबाजी मेदगे यांनी ही संघटना वाढविण्यासाठी मोठे योगदान दिले.

१३६ वर्षांची परंपरा असलेल्या या संघटनेचे राज्यातील सहा तालुक्यांमध्ये २ हजार ५०० सभासद आहेत. पंढरपूर, जेजुरी, आळंदी आणि भीमाशंकर या ठिकाणी संघटनेची जागा व धर्मशाळा इमारती आहेत. संघटनेच्या वतीने महाराष्ट्र शासनाकडून डबेवाल्यांसाठी डबेवाले भवन, ५ हजार फ्लॅटची घरे, कोरोना काळात अन्नधान्य, कपडे, सायकली, मोबाईल, टॅब आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच २०८ बाईक डबेवाल्यांना वाटप करण्यात आल्या आहेत, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष उल्हास मुके यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे माजी अध्यक्ष सोपान मरे यांनी केले. सूत्रसंचालन किरण गवांदे यांनी केले, तर आभार उपाध्यक्ष सबाजी मेदगे यांनी मानले.

---

# वाढत्या उष्म्याने भाव कडाडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** बारामती तालुक्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या उष्णतेचा परिणाम आता थेट भाजीपाला बाजारावर दिसून येत आहे.

कडक उन्हामुळे भाजीपाल्याचे उत्पादन घटले असून, तालुक्यातील सोनगावच्या आठवडे बाजारात टोमॅटो, कोथिंबीर, मिरचीसह विविध पालेभाज्यांच्या भावात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला झळ बसत असून, दुसरीकडे शेतकऱ्यांनाही अपेक्षित फायदा मिळत नसल्याचे चित्र आहे.

गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत आहे. उष्णतेमुळे भाजीपाला पिकांवर ताण येत असून, अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. विशेषतः कोथिंबीर, मेथी, पालक यांसारख्या पालेभाज्यांचे उत्पादन घटले आहे. परिणामी बाजारात आवक कमी झाल्याने दर वाढले आहेत.

सोनगावच्या आठवडे बाजारात कोथिंबिरीची जुडी २० ते ४० रुपयांवर पोहोचली असून, टोमॅटोचे दर प्रतिकिलो ४० ते ५० रुपये झाले आहेत. हिरवी मिरची, वांगी, भेंडी आणि काकडी यांच्याही दरात वाढ झाली आहे. मेथी, चाकवत, शेपू, पालक व तांदुळशा या भाज्यांचेही भाव वाढल्याने भाजीपाला खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांनी वाढत्या दरांबाबत नाराजी व्यक्त केली.

शेतकऱ्यांचे म्हणणे मात्र वेगळे आहे. भाव वाढले असले, तरी उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे. उष्णतेमुळे पिकांना वारंवार पाणी द्यावे लागत आहे. मजुरी, औषधे आणि वाहतूक खर्च वाढल्याने मिळणारा दर परवडत नाही, अशी प्रतिक्रिया काही भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

---

# कुल-थोरात यांच्यात पुन्हा संघर्ष?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** दौंड तालुक्याच्या राजकारणातील महत्त्वाचा केंद्रबिंदू मानल्या जाणाऱ्या भीमा-पाटस सहकारी साखर कारखान्याच्या घडामोडींनी पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे. आमदार राहुल कुल अध्यक्ष असलेल्या भीमा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची मुदत संपुष्टात आल्यामुळे कारखान्यावर प्रशासक नियुक्त करण्यात आला आहे. मंगळवारी दि. १२ रोजी प्रकाश जगताप यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

प्रशासक नेमणुकीनंतर आता आगामी काळात कारखान्याच्या निवडणुकांचे बिगुल वाजण्याची शक्यता अधिक गडद झाली आहे. त्यामुळे तालुक्यातील दोन प्रभावी राजकीय चेहरे आमदार राहुल कुल आणि माजी आमदार रमेश थोरात यांच्यात पुन्हा एकदा थेट संघर्ष रंगण्याची चिन्हे दिसत आहेत. राजकीय वर्तुळात आतापासूनच कारखान्याची सत्ता कोणाच्या हाती जाणार, यावर चर्चा रंगू लागली आहे.

भीमा-पाटस कारखान्याच्या सर्वसाधारण सभांमध्ये यापूर्वीही अनेकदा आ. राहुल कुल आणि माजी आमदार रमेश थोरात यांच्यातील राजकीय संघर्ष तालुक्याने पाहिला आहे. आरोप-प्रत्यारोप, कारखान्याच्या धोरणांवरून झालेली टीका, सभांमधील गदारोळ आणि एकमेकांवर केलेले राजकीय हल्ले यामुळे भीमा-पाटस कारखाना हा केवळ सहकार क्षेत्राचा विषय न राहता तालुक्यातील राजकीय संघर्षाचे व्यासपीठ ठरत गेला आहे. दौंड तालुक्यातील जनतेनेही अनेक वेळा कारखान्याच्या कामकाजावरून राजकीय वातावरण ढवळून निघताना अनुभवले आहे. त्यामुळे प्रशासक नेमणूक हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून, आगामी राजकीय रणधुमाळीची चाहूल असल्याचे बोलले जात आहे.आता येणाऱ्या काळात कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय आरोप-प्रत्यारोपांचे सत्र सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकीकडे विद्यमान नेतृत्वाचे वर्चस्व कायम ठेवण्याचे आव्हान असेल, तर दुसरीकडे सत्ताबदलाचे संकेत देणाऱ्या विरोधकांची रणनीती अधिक आक्रमक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तालुक्याच्या राजकीय पटावर भीमा कारखान्याची लढत पुन्हा एकदा तापणार का, की नव्या समीकरणांची निर्मिती होणार, याकडे आता संपूर्ण दौंड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

प्रकाश जगताप यांनी प्रशासकपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर कारखान्याच्या आगामी निवडणूक प्रक्रियेबाबत सभासदांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी १५ दिवसांच्या आत कारखान्याच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात करणे अपेक्षित आहे.

---

### विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त, योग, पारंपरिक खेळ आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे

# अण्णापूर शाळेत उन्हाळी संस्कार शिबिर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती :** अण्णापूर, ता. शिरूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत यावर्षी २ मेपासून उन्हाळी संस्कार शिबिर सुरू करण्यात आले आहे. पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्यात आलेला हा आगळावेगळा उपक्रम ठरत असून, शाळेतील तसेच शाळेबाहेरील अनेक विद्यार्थ्यांनी या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, व्यायामाची आवड, प्रार्थनेचे महत्त्व, मनःशांती, आत्मविश्वास, सहकार्यवृत्ती आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी साडेसात ते साडेदहा या वेळेत दररोज राष्ट्रगीत, प्रार्थना, सुविचार, संस्कार कथा, व्यायाम, योग, प्राणायाम, प्रेरणादायी व्हिडिओ, विविध हस्तकला आणि पारंपरिक खेळांच्या माध्यमातून विद्यार्थी शिबिराचा आनंद घेत आहेत.

या शिबिरात मुख्याध्यापक किसन शिंदे दररोज विद्यार्थ्यांना संस्कार कथा सांगत आहेत. तानाजी पाटील व्यायामाचे मार्गदर्शन करीत असून, माऊली कुरंदळे दररोज सुविचार कथन करतात. तसेच पारंपरिक खेळ, आठ चल्लस, चिंचोके, बुद्धिबळ आदी खेळांचे मार्गदर्शनही विद्यार्थ्यांना केले जात आहे. शिबिरात कॅरम, सुडोकू, सापशिडी, बॅडमिंटन आणि क्रिकेट अशा खेळांचाही विद्यार्थ्यांनी आनंद घेतला.

विलास महाराज पवार, ओंकार महाराज घेगडे, बबनराव गुंड, सुभाष कुरंदळे आणि संगीताताई पाटील यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. कल्पना कुरंदळे, छाया गुंड आणि जयश्री निचीत यांनी बैठे खेळ घेऊन विद्यार्थ्यांना पारंपरिक खेळ शिकवले. प्रफुल्ल सरदार यांनी विविध हस्तकलांची प्रात्यक्षिके घेतली. या शिबिरात एकूण ८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. पंचायत समितीचे माजी उपसभापती वाल्मिकराव कुरंदळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल कुरंदळे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. संतोष शिंदे आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना दररोज खाऊ उपलब्ध करून दिला. संस्काराबरोबरच पारंपरिक खेळ खेळत विद्यार्थी आनंद लुटत आहेत. सर्व शिक्षकांनी आपल्या उन्हाळी सुट्ट्यांचा त्याग करून हा उपक्रम यशस्वी केला आहे. या उपक्रमाचे गटशिक्षणाधिकारी डॉ. प्रीतम कोकणे, विस्तार अधिकारी बाळकृष्ण कळमकर, माजी सभापती वाल्मिकराव कुरंदळे, दादा पाटील, सरपंच दीपिका शिंदे, उपसरपंच मनीषा शिंदे तसेच अण्णापूर व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कौतुक केले.

---

# रस्ते विकासकामांमुळे नागरिक त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भिगवण :** भिगवण शहरात सुरू असलेल्या रस्ते विकासकामांमुळे नागरिकांच्या आयुष्यात विकासाऐवजी त्रासाची भर पडली आहे. विविध भागांत रस्ते खोदून कामे अर्धवट अवस्थेत सोडण्यात आल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. जागोजागी पडलेले खड्डे, उडणारी धूळ, वाहतुकीची गैरसोय आणि अपघातांचा वाढता धोका यामुळे नागरिक संतप्त आहेl.

भिगवण येथील वॉर्ड क्रमांक ३ मधील तुळजाभवानी मंदिराजवळील रस्ता नवीन करण्याच्या नावाखाली तब्बल पाच महिन्यांपूर्वी खोदण्यात आला. मात्र, आजपर्यंत काम पूर्ण झाले नसल्याने नागरिकांना रोजच जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून धुळीच्या प्रचंड त्रासामुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होऊ लागला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

याचप्रमाणे वॉर्ड क्रमांक ४ मधील थोरात नगर परिसरातही नवीन रस्त्याच्या कामासाठी मुख्य रहदारीचा रस्ता खोदण्यात आला आहे. गेल्या १५ ते २० दिवसांपासून सुमारे तीन फुटांहून अधिक खोल खड्डे करून काम अर्धवट अवस्थेत सोडण्यात आले आहे. त्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## सारांश वृत्त

### घुसखोरांचा भारतात प्रवेश रोखला

**गुवाहाटी:** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितले की, घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला गेला आणि बीएसएफ, पोलिस दलाच्या जवानांनी चौदा जणांना भारतात प्रवेश करण्यापासून रोखले. सरमा म्हणाले की, आंतरराष्ट्रीय सीमेवर सैन्याची नजर सुरू आहे आणि घुसखोरीविरूद्ध लढा सुरूच राहील. मुख्यमंत्र्यांनी एक्सवर पोस्ट केले की, शूर जवानांनी १४ बेकायदा लोकांच्या गटाची ओळख पटवली आणि त्यांना भारतात येण्यापासून रोखले.

### महिलेला ब्लॅकमेल केल्यामुळे गुन्हा दाखल

**भदोही**: उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यातील एका तरुणीला कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून अश्लील फोटो काढून ब्लॅकमेल केल्याप्रकरणी पोलिसांनी सायबर कॅफे चालक आणि त्याच्या भावाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घोसियामधील एका सायबर कॅफेचा संचालक तालिब आणि त्याचा भाऊ रफिक यांनी ऑनलाइन अपलोड न करण्यासाठी ५० हजार रुपये घेतले आणि नंतर काही अश्लील फोटो आणि मागील चॅट लॉगमुळे तिला आणि तिच्या पतीला पुन्हा ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला. तालिबने इन्स्टाग्रामवर महिलेशी मैत्री केली होती आणि त्यावर त्यांचे संभाषण झाले होते.

### मिथुन चक्रवर्ती यांनी केले सुवेंदूचे कौतुक

**कोलकाता** : पश्चिम बंगालचे ज्येष्ठ नेते मिथुन चक्रवर्ती यांनी शनिवारी त्यांच्या निवासस्थानी सुवेंदू अधिकारी यांची भेट घेतली. अधिकारी यांनी कोलकाता शेजारील न्यू टाऊन येथील चक्रवर्ती यांच्या निवासस्थानी भेट दिली आणि दक्षिण २४ परगणा येथील राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण डायमंड हार्बर हे पहिले गंतव्यस्थान असलेल्या जिल्ह्यांचा दौरा सुरू करण्यापूर्वी चर्चा केली. चक्रवर्ती यांनी अधिकारी यांचे वर्णन "पश्चिम बंगालचे सर्वोत्तम मुख्यमंत्री" असे केले आणि येत्या काही दिवसांत भाजप "वास्तविक बदल" घडवून आणतील असा विश्वास व्यक्त केला.

## राहुल गांधी, खर्गे यांच्यासह प्रमुख नेत्यांची सरकारवर टीका

# इंधन दरवाढीवरून विरोधकांचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीवरून काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि माकपसह अनेक विरोधी पक्षांनी शुक्रवारी केंद्र सरकारवर हल्ला चढवला. इंधन दरवाढीमुळे आधीच महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार असल्याचा आरोप विरोधकांनी केला.




विरोधकांच्या टीकेचे नेतृत्व करताना काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले की, मोदी सरकारच्या "चुकांची" किंमत जनता मोजत आहे. "३ रुपयांचा धक्का आधीच आला आहे; उर्वरित वसुली हप्त्यांमध्ये काढली जाईल," अशी टीका त्यांनी केली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला. नेतृत्वाचे संकट, दूरदृष्टीचा अभाव आणि अकार्यक्षमतेमुळे केंद्र सरकार देशाला आर्थिक संकटात ढकलत असल्याचा आरोप त्यांनी केला. खर्गे म्हणाले की, हे संकट सरकारने निर्माण केले असून, त्याचे परिणाम सामान्य नागरिकांना भोगावे लागत आहेत. जागतिक इंधन संकटाव्यतिरिक्त मोदी सरकारचे अपयश आणि व्यापक अकार्यक्षमता ही भारताच्या आर्थिक संकटामागील प्रमुख कारणे असल्याचा आरोप त्यांनी केला.

एका निवेदनात माकप पॉलिट ब्युरोने इंधन दरवाढीचा निषेध केला. या दरवाढीमुळे महागाई, बेरोजगारी, स्थिर वेतन आणि बिघडत्या आर्थिक परिस्थितीशी झगडत असलेल्या नागरिकांवर अतिरिक्त बोजा पडेल, असे पक्षाने म्हटले आहे.

माकपने दरवाढ तातडीने मागे घेण्याची मागणी केली असून, आपल्या सर्व युनिट्सना दरवाढीविरोधात निदर्शने करण्याचे आवाहन केले आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस डी. राजा यांनीही केंद्र सरकारवर टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विनाशकारी परराष्ट्र धोरणामुळे हे संकट निर्माण झाले असल्याचा आरोप त्यांनी केला.

समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव म्हणाले की, त्यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह असलेली सायकल हाच आता एकमेव पर्याय आहे. तृणमूल काँग्रेसने केंद्र सरकारवर निवडणुकीनंतर नागरिकांना फसवण्याचा आणि आर्थिक संकट अधिक गहिरे करण्याचा आरोप केला. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या सागरिका घोष यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, "मते लुटल्यानंतर आता तुम्ही नागरिकांची पर्स लुटत आहात."

इंधन दरवाढीच्या निर्णयामुळे विरोधकांनी केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, आगामी काळात या मुद्द्यावर देशभरात आंदोलनांची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सायबर गुलामगिरी प्रकरणी आरोपपत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** कंबोडियातील भारतीय तरुणांची तस्करी आणि सायबर गुलामगिरीशी संबंधित प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणेने कथित मास्टरमाइंडसह पाच जणांवर आरोपपत्र दाखल केले आहे. पाटणा येथील विशेष एनआयए न्यायालयात शुक्रवारी मानवी तस्करी टोळीचा कथित म्होरक्या आनंद कुमार सिंह उर्फ मुन्ना सिंह याच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले.

एनआयएच्या म्हणण्यानुसार, तपासात असे दिसून आले आहे की, आनंद हा या रॅकेटचा मुख्य आयोजक होता. भारतभरातील विविध उपएजंट आणि ट्रॅव्हल एजंट्सच्या माध्यमातून तरुणांची भरती करण्यात त्याचा सहभाग होता. एजन्सीच्या माहितीनुसार, त्याने कंबोडियातील सहयोगींच्या समन्वयाने पीडितांना दक्षिणपूर्व आशियाई देशात बेकायदेशीररीत्या पाठवण्याची व्यवस्था केली. बनावट कंपन्यांना विकल्या गेलेल्या प्रत्येक तरुणामागे आनंद २ हजार ते ३ हजार डॉलर्स आकारत होता.

संघटित मानवी तस्करी सिंडिकेटचा भाग म्हणून कायदेशीर नोकरी आणि चांगल्या पगाराच्या आमिषाने भारतीय तरुणांना कंबोडियात नेण्यात आरोपींचा सहभाग होता.

एनआयएने म्हटले आहे की, कंबोडियात पोहोचल्यानंतर पीडितांचे पासपोर्ट जप्त करण्यात आले. त्यानंतर त्यांना तथाकथित 'स्कॅम कंपन्यां'साठी काम करण्यास भाग पाडले गेले. विरोध केल्यास त्यांना मानसिक आणि शारीरिक छळाला सामोरे जावे लागले.

आरोपपत्र दाखल करण्यात आलेल्या सहआरोपींपैकी अभय नाथ दुबे आणि रोहित यादव हे दोघे उत्तर प्रदेशातील असून, अभिरंजन कुमार हा बिहारचा रहिवासी आहे. या तिघांना यावर्षी फेब्रुवारीमध्ये कंबोडियाहून राष्ट्रीय राजधानीत येताच अटक करण्यात आली होती. पाचवा आरोपी प्रल्हाद कुमार सिंह असून, तो सध्या जामिनावर बाहेर आहे.

या सिंडिकेटमधील इतर सदस्यांचा शोध घेण्यासाठी आणि या प्रकरणातील संपूर्ण कट उघडकीस आणण्यासाठी तपास सुरू असल्याचे एनआयएने स्पष्ट केले आहे.

## ममतांचा पक्षबांधणीचा निर्धार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला मोठा फटका बसल्यानंतर पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी संघटना नव्याने उभी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. शुक्रवारी कालीघाट येथील निवासस्थानी पक्षाच्या उमेदवारांची बैठक घेत त्यांनी कार्यकर्त्यांना पक्ष कार्यालये पुन्हा सुरू करण्याचे आणि संघटनेची पुनर्बांधणी करण्याचे आवाहन केले.

या बैठकीला तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जीही उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षात अस्वस्थता निर्माण झाली असून काही नेते पक्षांतर करू शकतात, अशी चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर ममता बॅनर्जी यांनी पक्षाच्या उमेदवारांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला.

"जे लोक इतर पक्षांकडे जात आहेत, त्यांना जाऊ द्या. मी पक्षाची नव्याने बांधणी करीन. जे लोक पक्षात राहणार आहेत, त्यांनी नुकसान झालेली पक्ष कार्यालये पुन्हा उभी करावीत, त्यांना रंग द्यावा आणि ती पुन्हा सुरू करावीत. गरज पडली तर मी स्वतःही रंग देईन. तृणमूल काँग्रेस कधीही झुकणार नाही," असे ममता बॅनर्जी यांनी बैठकीत सांगितल्याचे पक्ष सूत्रांनी म्हटले आहे. निवडणुकीनंतर पश्चिम बंगालमध्ये झालेल्या हिंसाचारात तृणमूल काँग्रेसच्या काही कार्यालयांची तोडफोड झाल्याचा आरोप पक्षाने केला आहे.

ममता बॅनर्जी यांनी यापूर्वीही भाजपवर तृणमूलच्या कार्यालयांना लक्ष्य केल्याचा आणि कार्यकर्ते तसेच उमेदवारांवर हल्ले केल्याचा आरोप केला होता. शुक्रवारच्या बैठकीत त्यांनी कार्यकर्त्यांना खचून न जाता संघटनेच्या कामाला लागण्याचे आवाहन केले. तृणमूल काँग्रेसच्या अधिकृत एक्स हँडलवरूनही बैठकीची छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात आली.

## इंधन दरवाढ मर्यादित आणि नियंत्रितच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इंधन दरवाढीच्या निर्णयाचे समर्थन करताना भाजपने शुक्रवारी दावा केला की, अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात महागाई वाढत असताना भारताने दोन महिन्यांहून अधिक काळ नागरिकांना जागतिक तेलधक्क्यापासून वाचवले. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या दरात करण्यात आलेली वाढ ही "मर्यादित आणि नियंत्रित" असल्याचे भाजपने म्हटले आहे.

जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे तेल विपणन कंपन्यांवर तोट्याचा दबाव वाढत होता. या पार्श्वभूमीवर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रतिलिटर ३ रुपयांची वाढ करण्यात आली. या निर्णयानंतर काही तासांतच भाजपकडून दरवाढीचे समर्थन करण्यात आले.

भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी दिलेल्या माहितीनुसार, पेट्रोलच्या किमतीत ३.२ टक्के, तर डिझेलच्या किमतीत ३.४ टक्के वाढ झाली आहे. "१५ मे रोजी जाहीर करण्यात आलेली प्रतिलिटर ३ रुपयांची वाढ ही सुमारे चार वर्षांतील पहिली इंधन दरवाढ आहे. सुमारे ९५ रुपये प्रतिलिटरच्या आधारभूत किमतीवर ही वाढ केवळ ३.५ टक्के आहे," असे मालवीय यांनी म्हटले.

मालवीय यांनी दावा केला की, भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांचा किरकोळ इंधन बाजारात सुमारे ९० टक्के वाटा आहे. पश्चिम आशियातील संकट तीव्र झाल्यानंतर ७६ दिवस या कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा संपूर्ण भार ग्राहकांवर टाकला नाही. त्यांनी स्वतःच्या खर्चाचा महत्त्वपूर्ण भाग शोषून घेतला, असेही त्यांनी सांगितले.

"पश्चिम आशियातील संकट तीव्र झाल्यानंतर भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांनी ७६ दिवस कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा भार ग्राहकांवर टाकला नाही. त्यांनी स्वतःच्या खर्चाचा मोठा भाग उचलला," असे मालवीय म्हणाले. त्यांच्या मते, तेल कंपन्यांची अल्प वसुली दररोज सुमारे १ हजार कोटी रुपयांवर पोहोचली होती.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतील व्यत्यय आणि तेलपुरवठ्यावर झालेला परिणाम यामुळे एप्रिल आणि मे महिन्यात बहुतांश काळ ब्रेंट क्रूडचे दर प्रति बॅरल १०० डॉलरच्या वर राहिले. त्याचा थेट परिणाम जगातील अनेक प्रमुख अर्थव्यवस्थांमधील इंधनदरांवर झाला, असे त्यांनी स्पष्ट केले.

## सुवेंदू अधिकारी सरकारचा कारवाईचा धडाका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये पहिल्या भाजप सरकारचे मुख्यमंत्री म्हणून सुवेंदू अधिकारी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच राज्यात प्रशासकीय कारवाईचा धडाका सुरू झाला आहे.

कोलकात्यातील तिलजाला भागातील चामड्याच्या कारखान्याला लागलेल्या आगीत दोन कामगारांचा मृत्यू आणि पाच जण जखमी झाल्यानंतर सरकारने तातडीने कारवाई करत संबंधित इमारतीवर बुलडोझर चालवण्याचे आदेश दिले.

१२ मे रोजी तिलजाला परिसरातील गर्दीच्या भागात असलेल्या चामड्याच्या कारखान्याला आग लागली होती. या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी संबंधित इमारत बेकायदेशीरपणे बांधण्यात आल्याचे जाहीर केले. त्यानंतर अवघ्या चोवीस तासांत बुलडोझर तैनात करण्यात आले. नव्या सरकारकडून बेकायदेशीर बांधकामांविरोधात कठोर भूमिका घेतली जाणार असल्याचा हा पहिला मोठा संदेश मानला जात आहे. शुक्रवारी नबन्ना येथे झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री अधिकारी यांनी आणखी एक मोठी घोषणा केली. कोलकात्याचे माजी पोलिस आयुक्त विनीत गोयल तसेच माजी उपायुक्त अभिषेक गुप्ता आणि इंदिरा मुखर्जी या तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. या निर्णयामुळे प्रशासकीय आणि पोलिस यंत्रणेत मोठी खळबळ उडाली आहे.

विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या मोठ्या विजयानंतर पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन झाले आहे. सत्तेवर आल्यानंतर पहिल्याच आठवड्यात सुवेंदू सरकारने घेतलेल्या या निर्णयांमधून नव्या सरकारचा कारभाराचा वेगळा अंदाज दिसून येत आहे.

## वर्षभरात सहा जखमी; पाचांचा झारखंडमध्ये मृत्यू

# जखमी हत्तींसाठी दोन बचाव केंद्रे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची :** आयईडी स्फोटांमध्ये जखमी होणाऱ्या वन्य हत्तींच्या उपचारासाठी सारंडाच्या जंगलात दोन विशेष बचाव केंद्रे विकसित करण्यात येत आहेत. गेल्या वर्षभरात सारंडा जंगलात माओवाद्यांनी लावलेल्या आयईडी स्फोटांमध्ये अनेक हत्ती जखमी झाले असून काहींचा मृत्यूही झाला आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाने ही महत्त्वाची पावले उचलली आहेत.



गुरुवारी संध्याकाळी उशिरा आयईडी स्फोटात जखमी झालेल्या एका जंगली हत्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर वन अधिकारी आणि वन्यजीवप्रेमींमध्ये चिंता वाढली आहे. जंगलात आवश्यक उपचार सुविधा उपलब्ध असत्या, तर हत्तीचा जीव वाचवता आला असता, असे वन अधिकाऱ्यांचे मत आहे.

सारंडा विभागीय वन अधिकारी अविरूप सिन्हा यांनी सांगितले की, अलीकडील स्फोटांच्या घटनांनंतर वन विभागाने पुढाकार घेतला आहे. "जंगलात आयईडी आहेत आणि हत्तींना कोणत्याही विशिष्ट भागापुरते मर्यादित ठेवता येत नाही. त्यामुळे आयईडी स्फोटात जखमी झाल्यास त्यांच्यावर तातडीने आणि योग्य उपचार करता यावेत, यासाठी दोन हत्ती बचाव केंद्रे विकसित केली जात आहेत. या केंद्रांना 'क्राल' असे म्हटले जाते," असे त्यांनी सांगितले.

जखमी झाल्यानंतर काही वेळा हत्ती आक्रमक होतात. अशा वेळी त्यांना सुरक्षित लोखंडी संरचनेत ठेवून उपचार करणे आवश्यक असते. या केंद्रांमध्ये जखमी हत्तींना सुरक्षित ठेवून वैद्यकीय उपचार दिले जाणार आहेत. आनंदपूर येथे एक आणि नोआमुंडी येथे दुसरे केंद्र विकसित करण्यात येत आहे. याशिवाय जमशेदपूरजवळील डिमना तलाव परिसरातही बचाव केंद्र सुरू करण्यात आले आहे.

वन विभागाने जखमी हत्तींच्या उपचारासाठी एक वैद्यकीय बचाव ट्रक आणि दोन वैद्यकीय व्हॅन घटनास्थळी तैनात केल्या आहेत. "आता आमच्याकडे डॉक्टरांची पूर्ण प्रशिक्षित आणि समर्पित टीम आहे. त्यामुळे हत्तींना कोणत्याही प्रकारची दुखापत झाल्यास बाह्य मदतीशिवाय उपचार करणे शक्य होईल," असे सिन्हा यांनी स्पष्ट केले.

माओवाद्यांनी सारंडा जंगलात लावलेल्या आयईडीमध्ये आतापर्यंत सहा हत्ती जखमी झाले आहेत. त्यापैकी पाच हत्तींचा झारखंडमध्ये मृत्यू झाला. झारखंडमधील इतर भागांतून माओवाद्यांना मोठ्या प्रमाणावर हुसकावण्यात आल्यानंतर त्यांची उपस्थिती आता मुख्यतः सारंडा जंगलापुरती मर्यादित राहिली आहे. सुमारे ४५ माओवादी लपून बसले असून त्यांनी हजारो आयईडी लावले आहेत. हे आयईडी सुरक्षा दलांसाठी मोठे आव्हान ठरत आहेत.

## अंतर्गत तपासणीसाठी अल्पवयीन मुलीला सक्ती नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** एखाद्या अल्पवयीन मुलीची अंतर्गत शारीरिक तपासणी करून घेण्याची इच्छा नसेल, तर तिच्यावर बलात्कार झाला आहे की नाही, हे ठरवण्यासाठी अशा तपासणीस सहमती देण्यास तिला भाग पाडता येणार नाही. तसे करणे म्हणजे तिच्या जखमेवर आणखी आघात करण्यासारखे ठरेल, असे स्पष्ट मत दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

उत्तर प्रदेशात जन्मलेल्या आपल्या ११ वर्षीय सावत्र मुलीवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली एका बांगलादेशी नागरिकाने दाखल केलेला जामीन अर्ज फेटाळताना न्यायमूर्ती गिरीश कठपालिया यांनी ही महत्त्वपूर्ण टिप्पणी केली. आरोपीने पीडित मुलीला या घटनेबाबत कोणालाही काही सांगू नये, अशी धमकी दिल्याचा आरोपही सरकारी पक्षाने केला आहे.

या प्रकरणात आपल्याला खोटे अडकवण्यात आले आहे, असा दावा करत आरोपीने उच्च न्यायालयात जामिनासाठी धाव घेतली होती. कथित घटनेच्या वेळी पीडित मुलगी ११ वर्षांपेक्षा अधिक वयाची होती, असा युक्तिवाद बचाव पक्षाने केला. तसेच, पीडितेच्या आईने अंतर्गत वैद्यकीय तपासणीस संमती दिली होती; मात्र मुलीने स्वतः ती तपासणी करून घेण्यास नकार दिला. त्यामुळे हा मुद्दा जामीन मंजूर करण्यासाठी विचारात घ्यावा, असा दावा आरोपीच्या वकिलांनी केला. मात्र, न्यायमूर्ती कठपालिया यांनी हा युक्तिवाद स्पष्ट शब्दांत फेटाळून लावला. न्यायालयाने मुलीच्या शारीरिक अखंडतेच्या अधिकारावर भर देत म्हटले की, "मुलीच्या शारीरिक अखंडतेचा आदर केला गेला पाहिजे. जर तिला अंतर्गत तपासणी करून घेण्याची इच्छा नसेल, तर अशा तपासणीसाठी तिला भाग पाडून तिच्या जखमेचा अपमान करण्याचा कोणालाही अधिकार नाही."

न्यायालयाने पीडितेच्या वयाबाबत बचाव पक्षाने केलेला दावाही फेटाळला. आरोपीने यापूर्वी शाळा प्रशासनासमोर मुलीच्या जन्मतारखेची पुष्टी करणारे प्रतिज्ञापत्र सादर केले होते, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. त्या कागदपत्रांच्या आधारे कथित गुन्ह्याच्या वेळी पीडित मुलगी ११ वर्षांची असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

## १८२ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी जाहीर केले की, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने १८२ कोटी रुपयांच्या 'जिहादी ड्रग'ची पहिली खेप जप्त केली आहे. मोदी सरकारने अमली पदार्थ मुक्त भारत करण्याचा संकल्प केला आहे, असे त्यांनी म्हटले आहे. शाह म्हणाले, "हे सांगताना आनंद होत आहे की, 'ऑपरेशन रेजपिल'च्या माध्यमातून आमच्या एजन्सींनी १८२ कोटी रुपये किमतीचे तथाकथित 'जिहादी ड्रग' कॅप्टॅगॉनची पहिली जप्ती केली आहे.

## आयसिसचा वरिष्ठ नेता ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकन आणि नायजेरियन सैन्याने संयुक्त कारवाईत इस्लामिक स्टेट गटाच्या एका वरिष्ठ नेत्याला ठार केल्याची माहिती अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी शुक्रवारी दिली. अबू-बिलाल अल-मिनुकी असे ठार झालेल्या दहशतवाद्याचे नाव असून, तो आयसिसच्या जागतिक कारवायांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचा दावा अमेरिकेकडून करण्यात आला आहे.

ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वरील पोस्टमध्ये या कारवाईची माहिती दिली. "माझ्या निर्देशानुसार शूर अमेरिकन सैन्य आणि नायजेरियाच्या सशस्त्र दलांनी जगातील सर्वात सक्रिय दहशतवाद्याला युद्धभूमीवरून हटवण्यासाठी काळजीपूर्वक नियोजित आणि अत्यंत गुंतागुंतीची मोहीम पार पाडली," असे त्यांनी म्हटले.

ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार, अबू-बिलाल अल-मिनुकी हा जागतिक स्तरावर आयसिसमधील दुसऱ्या क्रमांकाचा नेता होता. "तो आफ्रिकेत लपून राहू शकतो, असे त्याला वाटत होते; मात्र आमच्याकडे अशी माहिती देणारी साधने आहेत, ज्यामुळे ते काय करत आहेत, हे आम्हाला समजते," असे ट्रम्प यांनी नमूद केले.

अल-मिनुकीवर इस्लामिक स्टेट गटाशी संबंध असल्याच्या आरोपावरून अमेरिकेने निर्बंध लादले होते. पश्चिम आफ्रिकेच्या काही भागांमध्ये आयसिसशी संबंधित गटांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे.

## संरक्षण भागीदारीसह ऊर्जा पुरवठा आणि गुंतवणुकीचे करार

# मोदी यांच्या दौऱ्यामुळे भारत-युएई संबंधांना नवी ऊर्जा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील धोरणात्मक संबंधांना नवी गती मिळाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अबुधाबी भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये संरक्षण भागीदारीची चौकट, भारतीय धोरणात्मक पेट्रोलियम साठ्यात युएईचा वाढीव सहभाग, दीर्घकालीन एलपीजी पुरवठा, गुजरातमधील वाडीनार येथे जहाज दुरुस्ती क्लस्टर तसेच भारतात ५ अब्ज डॉलर गुंतवणुकीसंदर्भात महत्त्वाचे करार करण्यात आले.



इराणकडून संयुक्त अरब अमिरातीवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले झाल्यानंतर काही दिवसांतच पंतप्रधान मोदी यांनी चार युरोपीय देशांच्या दौऱ्यावर जाताना अबुधाबी येथे थांबा घेतला. या भेटीत त्यांनी युएईचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांची भेट घेऊन प्रादेशिक सुरक्षा, ऊर्जा सुरक्षेसह द्विपक्षीय सहकार्याच्या विविध मुद्द्यांवर चर्चा केली. होर्मुझची सामुद्रधुनी मुक्त, खुली आणि सुरक्षित राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले.

युएईवरील हल्ल्यांचा भारताने तीव्र निषेध केला असून, भारत संयुक्त अरब अमिरातीच्या खांद्याला खांदा लावून उभा आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. राष्ट्राध्यक्षांना "माझा भाऊ" असे संबोधत मोदी म्हणाले की, सध्याची कठीण परिस्थिती युएईने संयमाने हाताळली आहे. पश्चिम आशियात शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी भारत सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान कार्यालयाच्या निवेदनानुसार, दोन्ही नेत्यांनी सविस्तर चर्चा केली. यामध्ये प्रादेशिक शांतता, ऊर्जा आणि अन्नसुरक्षा, सुरक्षित सागरी मार्ग तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीतून निर्वेध जलवाहतूक या मुद्द्यांवर भारताची स्पष्ट भूमिका मांडण्यात आली. पश्चिम आशियातील संघर्षाचा परिणाम जागतिक पातळीवर जाणवत असल्याने या भागातील स्थैर्य भारतासाठीही महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या भेटीत ऊर्जा सुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले. संयुक्त अरब अमिरात हा भारतासाठी कच्चे तेल, एलएनजी आणि एलपीजी पुरवठ्यातील महत्त्वाचा भागीदार आहे. दोन्ही देशांनी सर्वसमावेशक ऊर्जा भागीदारीसाठी नवीन उपक्रमांना चालना देण्यावर सहमती दर्शवली. इंडियन स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्हस लिमिटेड आणि अबू धाबी नॅशनल ऑइल कंपनी यांच्यातील धोरणात्मक सहकार्य करारामुळे भारताच्या धोरणात्मक पेट्रोलियम साठ्यात युएईचा सहभाग ३० दशलक्ष बॅरलपर्यंत वाढणार आहे. तसेच भारतात धोरणात्मक वायू साठे उभारण्यासाठीही दोन्ही देश एकत्र काम करणार आहेत.